**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, DEC-JAN, 2021, VOL-9/43

# विद्यार्थी- शिक्षकांच्या बहुभाषिकताविषयक जागरूकतेच्या सद्यस्थितीचा आढावा

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Paper Received On:** 15 JAN 2021
**Peer Reviewed On:** 18 JAN 2021
**Published On:** 01 FEB 2021

**Abstract**

*भाषा हे संवादाचे साधन आहे. मानवी जीवनात संवादास व पर्यायाने भाषेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये संकेतात्मक भाषा होती, बदल होत पुढे ती प्रतिकात्मक, चित्रात्मक व विकासाच्या प्रसंगी लिपिबद्ध भाषा झाली व खऱ्या अर्थाने मानवाचा विकास होण्यास प्रारंभ झाला. दैनंदिन जीवनात तर भाषेचे खूपच महत्त्व आहे.*

***की वर्ड:*** *विद्यार्थी- शिक्षक, बहुभाषिकता, जागरूकता*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1) प्रस्तावना

दैनंदिन जीवनात तर भाषेचे खूपच महत्त्व आहे. व्यवहारात दळण-वळण, देवाण-घेवाण यासह भावनात्मक बाबींनाही तितकेच महत्त्व आहे व यात सर्वात महत्त्वाचे आहे ती भाषा. जागतिकीकरणाच्या युगामध्ये तर ज्यांना कार्यकर्तृत्व अथवा ध्येय, गाठायचे आहे, त्यांना बहुभाषिक असणे आवश्यक आहे कारण ती काळाची गरज आहे. जसे व्यक्तिमत्त्वाचे बहुआयाम आहेत त्यामध्ये बहुभाषिकता हा एक महत्त्वाचा आयाम आजच्या काळात बनला आहे व यापुढेही तो विकसित स्वरूपात असेल. असा कयास भाषातज्ज्ञांनी व्यक्त केलेला आहे, त्या अनुषंगाने जर बहुभाषिक शिक्षक असेल तर बहुभाषिकता हा गुण आपोआपच शालेय विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची संधी मिळेल.

## 2) संशोधन समस्या विधान

**विद्यार्थी- शिक्षकांच्या बहुभाषिकताविषयक जागरूकतेच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**3) संशोधनाची गरज** 1964-66 चा कोठारी आयोग 1986 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासारख्या विविध शैक्षणिक आयोगांनी भाषा शिक्षणावर भर दिला असला तरी संशोधकाच्या असे निदर्शनास आले की, शाळा महाविद्यालयांमधून दिले जाणारे भाषाशिक्षण प्रभावीपणे दिले जात नाही म्हणून संशोधकास प्रस्तुत संशोधन हाती घ्यावेसे वाटले.

**4) संशोधनाचे महत्त्व**

संशोधनाची विद्यार्थ्यांना बहुभाषिक होण्यास मदत होईल, त्यामुळे त्यांचा बौद्धिक विकास होऊन विद्यार्थी जागतिक स्पर्धेसाठी तयार होतील. विद्यार्थी बहुभाषिक होऊन ते स्वतःची विशेष ओळख निर्माण करतील तसेच त्यांना जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील

**5) संबंधित साहित्याचा आढावा**

**Annamalai, E (2001). Managing Multilingalism in India, sage publication. Pg no. 133.**

प्रस्तुत पुस्तकात बहुभाषिक विकास या प्रकरणात बहुभाषिकतेबद्दल एक नाविण्यपूर्ण विचार व्यक्त करण्यात आलेला आहे. त्यामध्ये एखाद्या व्यक्तीत बऱ्याच भाषेचे अस्तित्व असणे म्हणजे बहुभाषिकता असणे असा विचार व्यक्त करण्यात आलेला आहे.

**6) संशोधनाची उद्दिष्टे**

1) शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांच्या बहुभाषिकता विषयक जागरूकतेचा आढावा घेणे.

2) बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीचे वितरण करणे.

3) बहुभाषिकता  जागरुकता पदनिश्चयन श्रेणी द्वारे प्राप्त प्रतिसादांचे संकलन व विश्लेषण करणे.

4) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी द्वारे फलिते व निष्कर्षांची मांडणी करणे

**7) कार्यात्मक व्याख्या**

**7.1 विद्यार्थी शिक्षक:** माध्यमिक स्तरावरील शिक्षकी पेशासाठी सक्षम बनविणारा दोन वर्षाचा शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी.

**7.2 बहुभाषिकता:** मराठी, हिंदी सह इंग्रजी वा अन्य कोणत्याही भाषांचा ( बोली व प्रमाण भाषांचा) संवादात, चर्चेत, अध्ययन-अध्यापनात  सहज आणि सुगम पद्धतीने वापर म्हणजे बहुभाषिकता होय.

**7.3 जागरूकता:** एखाद्या विषयाबाबद सचेत होण्याची अवस्था.

बहुभाषिकतेसंदर्भात विद्यार्थी- शिक्षकांच्या बहुभाषिकताविषयक जागरूकतेच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने  तयार केलेली बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी तज्ज्ञांकडून तपासून मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ते बदल करून  अभ्यासाकरिता उपयोगात आणली गेली,

त्यात 250 विद्यार्थी शिक्षकांचा समावेश करण्यात आलेला होता, त्यांनी दिलेला प्रतिसाद व प्रत्याभरण याद्वारे घटकांची, विधानांची तपासणी करून तज्ज्ञांच्या सहाय्याने बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी या साधनाची संरचना व स्वरूप बदलण्यात आले, आवश्यक त्या दुरुस्त्या करून पदनिश्चयन श्रेणी या साधनास अंतिम स्वरूप देण्यात आले.

**8) शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांचा बहुभाषिकतेविषयीच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.**


***कोष्टक क्र: 1.1.***

***बहुभाषिकता विषयक सद्यस्थितीचा आढावा***

| अ. क्र. | संशोधन पद्धती | नमुना पद्धती | निवड | स्रोत | माहिती संकलन साधने | माहिती विश्लेषणाची साधने | माहिती प्रस्तुती व आलेख प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वेक्षण पद्धती | सहेतुक निवड | नमुना | शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षक | बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी | शेकडेवारी | वर्तुळालेख, स्तंभालेख |

**9) सर्वेक्षण पद्धती:**

प्रस्तुत उद्दिष्ट क्रमांक: 1. शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांचा बहुभाषिकतेविषयीचा सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला होता. सर्वेक्षणाच्या पुढील पायऱ्यांचा उपयोग संशोधकाने केला.




**ओघतक्ता क्रमांक: 1.1 सर्वेक्षण कार्यवाही तक्ता**

**10) जनसंख्या**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुणे जिल्ह्यातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्ष बी.एडच्या विद्यार्थी शिक्षकांचा समावेश जनसंसंख्येत केलेला होता.

**11) नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्ट क्रमांक: 1 साठी पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी- शिक्षकांची निवड न्यादर्शामध्ये करण्यात आली.

**नमुना निवड प्रक्रिया**

| अ. क्र. | शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे नाव | द्वितीय वर्ष विद्यार्थी संख्या | नमुना निवड पद्धती | एकूण नमुना |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय लांडेवाडी, मंचर | 50 | सहेतुक नमुना निवड | 41 |
| 2. | डॉ. मुमताज अहमद खान कॉलेज ऑफ एज्युकेशन, मंचर | 50 | सहेतुक नमुना निवड | 42 |
| 3. | ग्रामोन्नती मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नारायणगाव | 50 | सहेतुक नमुना निवड | 38 |
| 4. | डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ एज्युकेशन आकुर्डी , पुणे | 50 | सहेतुक नमुना निवड | 42 |
| 5. | धारेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे | 50 | सहेतुक नमुना निवड | 41 |
| 6. | ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे | 50 | सहेतुक नमुना निवड | 46 |
| | | | | 250 |

6 शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी माध्यमाचे द्वितीय वर्षाचे 250 विद्यार्थी शिक्षक नमुना म्हणून घेतले नमुना निवड असंभाव्यता प्रकारातील सहेतुक नमुना निवड पद्धतीने केली. 250 विद्यार्थी - शिक्षकांनी सर्वेक्षणाद्वारे पदनिश्चयन श्रेणी भरून आपला बहुभाषिकतेविषयीचा प्रतिसाद नोंदविला.

**12) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे प्रशासन**

पथदर्शी अभ्यास, सूचना, तज्ञांकरवी आशय वैधता आदीं प्रक्रियेनंतर संशोधकाने बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीत आवश्यक ते बदल करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण विभागातील एकूण 250 विद्यार्थी- शिक्षकांकडून बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणी भरून घेतली व विद्यार्थी शिक्षकांमध्ये बहुभाषिकतेविषयक असणा-या जागरूकतेचा आढावा घेतला.

**13) माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन**

बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीच्या साह्याने प्राप्त झालेल्या माहितीचे निष्कर्ष काढण्यासाठी संख्याशास्त्रीय तंत्राचा आधार घेण्यात आला यामध्ये खालील साधने वापरली गेली.

**14) शेकडेवारी**

शेकडेवारी हे असे तंत्र आहे ज्यामधून प्रतिसादकांनी नोंदविलेल्या प्रतिसादांचे रुपांतर शेकडा प्रमाणात केले जाते. (कदम, 2010)

**15) वर्तुळालेख / स्तंभालेख**

आलेख हे संख्याशास्त्रीय तंत्र विद्यार्थी व शिक्षकांमध्ये खूपच लोकप्रिय असे तंत्र असून ज्यामधून प्रतिसादकांनी नोंदवलेल्या प्रतिसादाचे रूपांतर सांख्यिकीय तंत्राच्या साह्याने आलेखीय स्वरूपात मांडले जाते. ज्याद्वारे सामान्य वाचकास या माहितीचा अन्वयार्थ अगदी निरीक्षण करून समजून घेता येतो, त्यामुळे संशोधकाने प्राप्त माहितीच्या आधारे, माहितीचे विश्लेषण कोष्टकाद्वारे व आलेखाद्वारे केलेले आहे.

**16) संकलित माहितीचे विश्लेषण**

**शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांच्या बहुभाषिकता जागरूकतेसंदर्भातील सद्यस्थितीचे विश्लेषण**

**उद्दिष्ट क्रमांक 1 :** शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांचा बहुभाषिकतेविषयीच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन प्रश्न:** शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांची बहुभाषिकतेविषयी सद्यस्थिती काय आहे?

प्रस्तुत उद्दिष्टासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्ह्यातील 6 शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण 250 विद्यार्थी- शिक्षकांकडून बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी भरून घेतली होती.

बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी एकूण 175 गुणांची होती. त्यामध्ये सात घटकांचा समावेश होता. प्रत्येक घटकावर पाच अशी एकूण 35 विधाने समाविष्ट होती. प्रत्येक विधानासाठी नेहमीच, बहुदा, गरजेनुसार, क्वचित, कधीच नाही असे पर्याय देण्यात आले होते. नेहमीच या पर्यायाखाली अशी खूण केली असता पाच गुण देण्यात आले होते. बहुदा या पर्यायाखाली अशी खूण केली असता चार गुण देण्यात आले होते, गरजेनुसार या पर्यायाखाली अशी खूण केली असता तीन गुण देण्यात आले, क्वचित या पर्यायात खाली अशी खूण केली असता दोन गुण देण्यात आले होते आणि कधीच नाही या पर्यायाखाली अशी खूण केली असता एक गुण देण्यात आला होता. याप्रमाणे सर्व 250 शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांकडून भरून आलेल्या बहुभाषिकता जागरूकता

पदनिश्चयन श्रेणीचे मूल्यमापन करण्यात आले. हे मूल्यमापन केल्यानंतर विद्यार्थी शिक्षकांना प्राप्त झालेल्या गुणांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले.

**17) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना मिळालेल्या गुणांचे श्रेणीनुसार विश्लेषण**.

शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये मिळालेल्या गुणांसाठी खालीलप्रमाणे श्रेणी निश्चित करण्यात आल्या. डॉ. आर. एच. दवे समितीने कमीत कमी अध्ययन क्षमता पातळी ( Minimum Learning Level) यावर अभ्यास करून एक अहवाल सादर केला त्याचा संदर्भ घेऊन, प्रभुत्व ऐवजी समांतर श्रेणी शब्द वापरले जसे की उत्कृष्ट, चांगला, समाधानकारक व असमाधानकारक आणि पुढीलप्रमाणे बहुभाषिकता जागरूकता पातळ्या निश्चित केल्या.

**कोष्टक क्रमांक 1.2**

बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीसाठी श्रेणी निश्चिती

| गुणांचा विस्तार | श्रेणी |
|---|---|
| 70 % पेक्षा अधिक | उत्कृष्ट |
| 60% ते 69% | चांगला |
| 50% ते 59% | समाधानकारक |
| 50 % पेक्षा कमी | असमाधानकारक |


बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना मिळालेल्या गुणांचे श्रेणीनुसार विश्लेषण पुढीलप्रमाणे केले.

**कोष्टक क्रमांक 1.3**

**बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना मिळालेल्या गुणांचे श्रेणीनुसार विश्लेषण**.

| गुणांचा विस्तार | श्रेणी | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 70 % पेक्षा अधिक | उत्कृष्ट | 103 | 41 % |
| 60% ते 69% | चांगला | 52 | 21 % |
| 50% ते 59% | समाधानकारक | 50 | 20 % |
| 50 % पेक्षा कमी | असमाधानकारक | 45 | 18 % |

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*




**आलेख क्रमांक 1.1: बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना श्रेणीनुसार मिळालेले गुण**

**निरीक्षण:** बहुभाषिकता जागरूकता चाचणीमध्ये 41 % शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना 70 % पेक्षा अधिक गुण मिळाले, 21% विद्यार्थी शिक्षकांना 60% ते 69 % दरम्यान गुण मिळाले, 20% विद्यार्थी शिक्षकांना 50% ते 59 % दरम्यान गुण मिळाले तर 18% विद्यार्थी शिक्षकांना 50 % पेक्षा कमी गुण मिळाले.

**अर्थनिर्वचन:** बहुतांश शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांची बहुभाषिकता जागरूकता उत्कृष्ट दर्जाची आहे.ज्या विद्यार्थ्यांची बहुभाषिकता जागरूकता असमाधानकारक आहे अशा विद्यार्थ्यांची निवड संशोधकाने बहुभाषिकता जागरूकता कार्यक्रमासाठी नमुना म्हणून केली आहे.


**18) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे घटकानुसार विश्लेषण:**

बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये एकूण सात घटकांचा समावेश होता. प्रत्येक घटकावर पाच प्रश्न विचारले गेले होते. एका प्रश्नासाठी 5 गुण याप्रमाणे प्रत्येक घटकावर एकूण पंचवीस गुणांचे प्रश्न विचारण्यात आले होते. शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये मिळालेल्या गुणांचे घटकनिहाय विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आले आहे.

**कोष्टक क्रमांक 1.4**

**बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे घटकानुसार विश्लेषण**

| बहुभाषिकता घटक | सरासरी गुण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| भाषिक | 16.59 | 66.37 % |
| साहित्यिक | 17.36 | 69.47 % |
| सांस्कृतिक | 17.66 | 70.67 % |
| सामाजिक | 17.16 | 68.64 % |
| राजकीय | 16.82 | 67.30 % |
| शैक्षणिक | 17.68 | 70.74% |
| व्यवसायिक | 18.32 | 73.31 % |




**आलेख क्रमांक 1.2: बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये शिक्षणशास्त्र विद्यार्थी-शिक्षकांनी घटकानुसार दिलेला प्रतिसाद.**

**निरीक्षण :** शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांना बहुभाषिकतेच्या भाषिक, साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व्यवसायिक या घटकांमध्ये अनुक्रमे 66.37%, 69.47%, 70.67%, 68.64%, 67.30%, 70.74% आणि 73.31% असे गुण मिळाले. बहुभाषिकतेच्या व्यवसायिक या घटकासाठी सर्वात जास्त म्हणजे 73.31 % एवढे गुण मिळाले तर भाषिक या घटकासाठी कमीत कमी म्हणजे 66.37 % एवढे गुण मिळाले.

**अर्थनिर्वचन:** शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांची बहुभाषिकतेच्या व्यवसायिक घटका संदर्भातील जागरूकता अधिक आहे तसेच भाषिक घटका संदर्भातील जागरूकता कमीत कमी आहे.

**19) निष्कर्ष**

1) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये उत्कृष्ट श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांची संख्या 103 असून त्याचे शेकडा प्रमाण 41 टक्के आहे.

2) चांगली श्रेणी मिळविणारे विद्यार्थी शिक्षक 52 असून त्याचे शेकडा प्रमाण 21 टक्के आहे.

3) 50 विद्यार्थी शिक्षकांना समाधानकारक श्रेणी मिळाली व त्याचे शेकडा प्रमाण 20 टक्के आहे.

4) 45 विद्यार्थी शिक्षकांना श्रेणीमध्ये असमाधानकारक श्रेणी मिळाली व त्याचे शेकडा प्रमाण 18 टक्के आहे.

5) बहुभाषिकता जागरूकतेच्या व्यवसायिक घटकासाठी 73.31 टक्के एवढे म्हणजेच सर्वात जास्त गुण मिळाले.

6) बहुभाषिकता जागरूकतेच्या भाषिक या घटकासाठी कमीत कमी म्हणजेच 66.37 टक्के एवढे गुण मिळाले.

**20) शिफारसी**

1) शिक्षणशास्त्र विद्यार्थी शिक्षकांमध्ये बहुभाषिकतेच्या भाषिक या घटका बाबत जागरूकता होणे गरजेचे आहे.

2) विद्यार्थी शिक्षकांनी आपली भाषा सोडून अन्य भाषिकांशी वेळोवेळी संवाद साधावा.

3) विद्यार्थी शिक्षकांनी बोलताना एका भाषेबरोबर दोन किंवा अधिक भाषांचा वापर करावा.

4) विविध स्तरावरील पाठ्यपुस्तके तयार करताना व दैनंदिन अध्यापनात विद्यार्थ्यांच्या बोलीभाषांचा विचार व्हावा.

## संदर्भ

*Cummings, J & Swain, M. (1990).Bilingualism in education: Longman Publication,Pg.No.89*

*Cock, vivian. (2010). Language and Bilingual Cognition, Psychology Press.*

*Chomskey, N.C. (1965). Aspects of the theory of Syntax, MIP Press.*

*Dug, H.R. (1997). Ecology of Multilingualism, yashoda publication,mysore.pg.no.80.*

*अकोलकर, ग.वि. आणि पाटणकर ना.वि., (1993). मराठीचे अध्यापन. पुणे. व्हीनस प्रकाशन.*

*अहेर, हि. (१९९५).उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक ,नागपूर : विद्या प्रकाशन.*

*कदम, चा .(२००७). शैक्षणिक संख्याशास्त्र (प्रथमावृत्ती ).नित्यनूतन प्रकाशन.*

*कोठारी आयोग अहवाल, (1966). त्रिभाषा सूत्र प्रकरण VIII, नवी दिल्ली. शिक्षण मंत्रालय. पृष्ठ: 205*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*